माहिती हवीय?

सुनील राजाराम डोईफोडे, सायन, मुंबई.

□ लता मंगेशकरना कोणकोणत्या चित्रपटासाठी फिल्मफेअर पारितोषिक मिळालं? त्यांनी कोणकोणत्या चित्रपटात अभिनय केला?

— *मधुमती, बीस साल बाद, खानदान, जीने की राह* या चित्रपटासाठी लता मंगेशकरना फिल्मफेअर पारितोषिक मिळालं. *पहिली मंगळागौर, माझं बाळ, चिमुकला संसार, गजाभाऊ, बडी माँ, जीवनयात्रा, सुभद्रा* या चित्रपटात लताबाईंनी अभिनय केला. *छत्रपती शिवाजी* व *पुकार* या चित्रपटात एका गाण्यात त्या पडद्यावर दिसल्या.

□ अनिल कपूर व माधुरी दीक्षित यांनी कोणकोणत्या चित्रपटात एकत्र भूमिका केली?

— *हिफाजत, तेजाब, राम लखन, परिंदा, बेटा, खेल, जिंदगी एक जुआ, राजकुमार, पुकार.*

साहिल यशोधन, कारवे.

□ राखी व अमिताभ कोणकोणत्या चित्रपटात एकत्र आले? आई-मुलाच्या भूमिकेत कोणकोणत्या चित्रपटात ते एकत्र चमकले?

— *त्रिशूल, कस्मे वादे, जुर्माना, काला पत्थर, बरसात की एक रात, बेमिसाल, शक्ती, शान* हे अमिताभ व राखी यांनी एकत्र भूमिका केलेले चित्रपट. यापैकी *शक्ती*मध्ये राखी अमिताभची आई बनली होती. आणि *शान*मध्ये वहिनी.

□ राजेश खन्ना व डिम्पल कोणकोणत्या चित्रपटात एकत्र आले?

— *जय जय शिवशंकर* या एकाच चित्रपटात ते दोघे एकत्र आले. पण हा चित्रपट पडद्यावर आलाच नाही.

विद्या अनंत संगमनेरकर, आंबेजोगाई.

□ भावना या अभिनेत्रीचे खरे नाव काय? तिने कोणकोणत्या चित्रपटात भूमिका केल्या? नायक कोण?

— भावनाचे खरे नाव सुमन. *पाठलाग* (डॉ. काशिनाथ घाणेकर), *मंगळसूत्र* (अशोक ताटे), *मानला तर देव* (डॉ. काशिनाथ घाणेकर), *अधिकार* (नरेन चव्हाण) यासारख्या काही चित्रपटात तिने भूमिका केल्या.

सुलक्षणा वसंत मंगनाळे, बाबूर्ड.

□ कोणकोणत्या नेत्यांनी गंमत म्हणून चित्रपटात भूमिका केलीय?

— जांबुवंतराव धोटे (*पाच खिलाडी*), राज नारायण (*मनू द ग्रेट*), प्रमोद नवलकर (*ह्योच नवरा पाहिजे*), छगन भुजबळ (*दैवत*), बबन घोलप (*निलांबरी*)

□ कोणकोणत्या खेळाडूंनी चित्रपटात नशीब अजमावून पाहिलं?

— सुनील गावस्कर (*सावली प्रेमाची, गोलमाल*), मोहसीन खान (*साथी*), कपील देव (*क्रिकेटर*), संदीप पाटील (*कभी अजनबी थे*).

भरत चंद्रकांत कालुकाका, माहिम.

□ *दीवार, डॉन, अमर अकबर ॲन्थोनी, जानी दुश्मन, नागिन, महुआ, घरौंदा, गोलमाल, मेरे अपने, जख्मी* हे चित्रपट कधी प्रदर्शित झाले? कलाकार, संगीतकार, निर्माता, दिग्दर्शक कोण?

— *दीवार* नावाचा चित्रपट दोनदा आला. पहिला १९५५ला. दुसरा १९७५ला.

अतुल वारे, जातेगाव.

□ हिंदीत चांगला जम बसल्यावर मराठीत आलेल्या मराठी चित्रतारका कोण?



छत्रपती शिवाजीमध्ये श्रीराम गोजमगुंडे - स्मिता पाटील

— शशीकला, नूतन, तनूजा, नलिनी जयवंत, स्मिता पाटील, शिल्पा शिरोडकर.

१९५५च्या *दीवार*चे कलाकार करण दीवाण मुन्वर सुलताना, मुराद भगवान, शेख मुख्तार, शम्मी. संगीतकार महंमद शफी, निर्माता इंद्रलोक पिक्चर्स. दिग्दर्शक एस. खलिल. १९७५च्या *दीवार*चे कलाकार अमिताभ बच्चन, शशी कपूर, परवीन बाबी, नीतू सिंह, निरुपा रॉय, मदन पुरी, इफ्तेकार, संगीतकार आर.डी. बर्मन, निर्माता गुलशन रॉय, दिग्दर्शक यश चोप्रा. *डॉन* १९७८ला आला होता. कलाकार अमिताभ-झीनत, हेलन, कमल कपूर, प्राण, इफ्तेकार, ओम शिवपुरी, शेट्टी. *अमर अकबर ॲन्थोनी* १९७७ला आला होता. कलाकार अमिताभ, विनोद खन्ना, ऋषी कपूर, परवीन बाबी, शबाना आझमी, नीतू सिंह, जीवन, निरुपा रॉय, मुकरी, प्राण, रणजीत. संगीत लक्ष्मीकांत-प्यारेलाल. निर्माता-दिग्दर्शक मनमोहन देसाई. *जानी दुश्मन* १९७९ला आला होता. कलाकार सुनील दत्त, संजीवकुमार, शत्रुघ्न सिन्हा, विनोद मेहरा, रेखा, रीना रॉय, विक्रम, प्रेमनाथ, बिंदिया गोस्वामी, जितेंद्र, अरुणा ईराणी, संगीत लक्ष्मीकांत-प्यारेलाल, निर्माता, दिग्दर्शक राजकुमार कोहली. *नागिन* नावाचा चित्रपट तीनदा आला. १९३४ला पहिला, १९५४ला दुसरा, १९७६ला तिसरा. १९३४च्या *नागिन*चे कलाकार अन्वरी निंबाळकर, चंदू, राधा अमन, निर्माता राधा फिल्म कार्पोरेशन, दिग्दर्शक ज्योतिष बॅनर्जी, संगीत केळकर, १९५४च्या *नागिन*चे कलाकार वैजयंतीमाला, प्रदीपकुमार, जीवन, मुबारक, एस. एल. पुरी, कमल, कृष्णाकुमारी, जोहर, संगीत हेमंतकुमार, निर्माता फिल्मीस्तान, दिग्दर्शक नंदलाल जसवंतलाल. तिसरा *नागिन* १९७६ला आला होता. कलाकार जितेंद्र, सुनील दत्त, रीना रॉय, मुमताज, रेखा, योगिता बाली, फिरोज खान, विनोद मेहरा, कबीर बेदी, नीलम मेहरा, प्रेमानारायण, अनिल धवन, संजय खान, हीना कौसर, प्रेमनाथ, रणजीत, रूपेशकुमार, कोमिला विर्क, जगदीप, गुलशन अरोरा, आरती, अनिता गुहा, मारुती. संगीत लक्ष्मीकांत-प्यारेलाल, निर्माता-दिग्दर्शक राजकुमार कोहली, जख्म १९९८ला आला होता. कलाकार अजय देवगण, सोनाली बेंद्रे, पूजा भट्ट, अक्षय आनंद, आशुतोष राणा, शरद सक्सेना. संगीत एम. एम. करीम. निर्माती पूजा भट्ट. दिग्दर्शक महेश भट्ट. *गोलमाल* १९७९ला आला होता. कलाकार अमोल पालेकर, बिंदिया गोस्वामी, उत्पल दत्त, डेव्हिड, देवेन वर्मा, अमिताभ बच्चन, संगीत आर.डी. बर्मन. निर्माता एन.सी. सिप्पी, हृषिकेश मुखर्जी. दिग्दर्शक हृषिकेश मुखर्जी, *मेरे अपने* १९७१ला आला होता. कलाकार मीनाकुमारी, विनोद खन्ना, शत्रुघ्न सिन्हा, मास्टर चिंटू, सुमिता संन्याल, रमेश देव, देवेन वर्मा, अभि भट्टाचार्य, केस्तो मुखर्जी, लीला मिश्रा, देव किशन, असरानी, पेंटल, असित सेन, संगीत सलिल चौधरी, निर्माता रोमू एन. सिप्पी, दिग्दर्शक गुलजार. ●